सहजिवन शिक्षण प्रसारक
मंडळ शिक्षणशास्त्र महाविद्यालय
टेंहू ता. पारोळा जि. जळगाव

# अंतरवासिता

अंतरवासिता शाळेचे नाव:-

ज्ञानदीप माध्यमिक विद्यालय पारोळा
जि. जळगाव

विद्यार्थी शिक्षक:- मुक्ता धनराज चौधरी

मार्गदर्शक:- प्रा. डॉ संजय मोरे सर
[B.Sc. M.A, M.ed, Ph.D, DSM]

सन:- 2023-2024

Page No. Date :

# * अनुक्रमणिका *



| अ. क्र | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| • | दाखला | |
| १ | प्रस्तावना | |
| २ | अंतरवासिता :- अर्थ व संकल्पना | |
| ३ | अंतरवासिता :- महत्त्व | |
| ४ | अंतरवासिता :- उद्दिष्टे | |
| ५ | अंतरवासिता :- वैशिष्ट्ये | |
| ६ | प्रत्यक्षकार्यवाही | |
| ६.१ | शाळेची माहिती / परिचय | |
| ६.२ | शाळेतील शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची माहिती | |
| ६.३ | वर्गखोल्यांची माहिती | |
| ६.४ | विद्यार्थ्यांचा डाटा | |
| ६.५ | शाळेतील शैक्षणिक संसाधन विषयी माहिती | |
| ६.६ | शाळेत शिकवले जाणारे विषय | |
| ६.७ | शालेय वेळापत्रक | |
| ६.८ | मध्यान्ह भोजनाविषयी माहिती | |
| ६.९ | शाळेतील रेकॉर्ड | |


Bright

Page No. Date :


| अ.क्र | तपशील | पृष्ठ क्र |
| --- | --- | --- |
| | • विद्यार्थी हजेरीपत्रक | |
| | • संचयी नोंदपत्रक | |
| | • शिक्षक हजेरी | |
| ६.१० | विद्यालयासंबंधी रेकॉर्ड | |
| ६.११ | प्रयोगशाळा | |
| ६.१२ | संगणक कक्ष | |
| ६.१३ | शिक्षण - व्यतिरिक्त कार्यक्रम | |
| ६.१४ | परिपाठ - प्रार्थना | |
| ७ | शालेय उपक्रम | |
| ७.१ | संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान | |
| ७.2 | सावित्रीबाई फुले जयंती | |
| ७.3 | स्वामी विवेकानंद व जिजाऊमाता जयंती | |
| ७.४ | हळदी कुंकू | |
| ७.५ | सांस्कृतिक कार्यक्रम | |
| ७.६ | आनंद मेळावा | |
| ७.७ | कृतीसंशोधनाची माहिती | |
| ७.८ | निरोप समारंभ | |
| ८ | समारोप | |


Bright


भारत राजकीय

EXPERIMENT : No.

Page No.
Date

# * दाखला *

दाखला देण्यात येतो की, श्रीमती :- मुक्ता धनराज चौधरी ह्या ज्ञानदिप माध्यमिक विद्यालय पारोळा ता. पारोळा जि. जळगाव या शाळेवर आंतवासिका अधिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक 12 डिसेंबर ते 2024 पर्यंत अंतरवासिता नियमीतप्रमाणे पार पाडली.

सदर आंतरवासिता त्यांनी दुसऱ्या कोणत्याही शाळेवर केलेली नाही याकरिता दाखला देण्यात आला आहे.

मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय, पारोळा
[illegible] जळगांव
मुख्याध्यापक

ज्ञानदिप माध्यमिक विद्यालय
पारोळा ता पारोळा
जि. जळगाव

Teacher's Sign. :

# फोटो



आंतरवासिकेचा पहिला दिवस

EXPERIMENT : No. 1

Page No. Date

## प्रस्तावना :-

अंतरवासिता अहवाल चा विद्यालयाचा प्रत्येक घटकांचा स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. विद्यालयातील प्रत्येक घटकाचा समावेश या अहवालात होत असतो. विद्यालयाच्या लहानात लहान विशेषतांपासून तर मोठ्यात मोठ्या विशेष घटकाच्या समावेश आहे. विद्यालयातील सर्व घटकांचे बारीक निरिक्षण करुन येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. माझे असे मत आहे की, विद्यालय ही फक्त चार भिंतींची इमारत नसून त्यात विविध जाती, धर्म, वंश परंपरेचे विद्यार्थी व शिक्षक एकत्र येवून आपल्या कर्तव्याचे पालन करत असतात या अहवालात विद्यालयातील सर्व घटकांचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे.

हा अहवाल विद्यालय तसेच या विद्यालयातील कार्य समजण्यासाठी मदत करतो.

Sundaram Teacher's Sign. :

# आंतरवासिकेचा पहिला दिवस



EXPERIMENT : No. 2

Page No. | Date

# अंतरवासिता :- अर्थ व संकल्पना :-

भारतात 1963 ला NCERT ने अध्यापनातील इंटरनशीप हे संकल्पना मांडली व त्यावर अनेक प्रयोगही झाले. शिक्षण प्रशिक्षण संदर्भात राष्ट्रीय पातळीवर समानता असावी प्रशिक्षणाचा एक विशिष्ट दर्जा टिकावा म्हणून एक स्वतंत्र कायद्याचे NCTE (राष्ट्रीय अध्यापक, शिक्षण परिषद) ची स्थापना झाली. विद्यापीठ अनुदान मंडळ (UGC) व NCTE यांच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे शिक्षणप्रशिक्षण अभ्यासक्रमात आंतरवासिता असावश्यक भाग झाला.

अध्यापन ही एक कला आहे ही कला जन्मत: च प्राप्त नसली तरी ती प्रशिक्षणाने मात्र आत्मसात करता येवू शकते यासाठी विद्यार्थी शिक्षकांना छात्र सेवाकालाची गरज आहे. विद्यार्थी शिक्षकास भावी व्यवसायात प्रवेश करण्यापूर्वी मिळणारा त्या कामाचा अनुभव म्हणजेच छात्रसेवाकाल होय.

Sundaram

Teacher's Sign. :

# * अंतरवासिता :- महत्व

1) विद्यार्थी शिक्षक छात्रसेवाकाल करत असतांना त्याला शिक्षणातील तात्विक व प्रात्यक्षिक भागातील दरी प्रकर्षाने जाणवत असेत ती दरी दूर करण्याच्या दृष्टीने छात्रसेवाकाल योजना प्रभावी ठरु शकते.

2) छात्रसेवाकाल करत असतांना विद्यार्थी शिक्षकांना अध्यापनाबरोबरच शाळेसंबंधीच्या महत्वाच्या बाबी म्हणजे शालेय दप्तर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, क्रीडांगण, विविध स्पर्धा पाठ्यक्रमानुवर्ती उपक्रम इ. गोष्टींचाही अनुभव येईल ज्याने त्यांचे विश्व अनुभवसंपन्न होईल

3) छात्रसेवाकालात विद्यार्थी शिक्षकांचा विद्यार्थ्यांशी जवळचा संबंध येतो. यामुळे विद्यार्थ्यांशी सुसंवाद निर्माण होऊन एकमेकांमध्ये सहकार्याची भावना निर्माण होते व शिस्तीचा प्रश्नच उरत नाही याचा फायदा विद्यार्थी शिक्षकांना पुढे ते शिक्षक झाल्यावर नक्कीच मिळतो.

4) छात्रसेवाकालमध्ये मिळालेल्या कालावधीत विद्यार्थी शिक्षकांना अखंड व सुसंगत अशा पद्धतीने अध्यापन करण्याची संधी मिळते यामुळे त्यांचे अध्यापनकौशल्य सुधारते.

EXPERIMENT : No. 8

Page No. | Date

# अंतर्वासिता :- उद्दिष्टे :-

① शिक्षक प्रशिक्षणार्थीमध्ये आपल्या व्यावसायाविषयी निष्ठा निर्माण करणे.

② विद्यार्थी शिक्षकामध्ये शैक्षणिक व प्रशासकीय कौशल्य निर्माण करणे.

③ छात्रसेवाकालात शिक्षक प्रशिक्षणार्थीकडून उत्कृष्ट अध्यापनकार्याची तयारी करून घेणे.

④ छात्रसेवाकालात प्रशिक्षण घेत असतांना या भावी शिक्षकामध्ये पर्यावरण विषयक दृष्टिकोन विकसित करणे

⑤ विद्यार्थी शिक्षकांना छात्रसेवाकालात अनुभवी शिक्षकांचे पाठ निरिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे

⑥ छात्रसेवाकालात अध्यापनाबरोबरच अभ्यासपूरक कार्यक्रमांचे नियोजन करण्याचे कौशल्य विकसित करणे

⑦ छात्रसेवाकालात अध्यापनबरोबरच विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करायचे याचे कौशल्य विकसित करणे

⑧ छात्रसेवाकालात विद्यार्थीचे शिक्षकांना उत्तम व अनुभवी शिक्षकांच्या हाताखाली काम करायची संधी मिळवून देणे.

⑨ विद्यार्थी शिक्षकांना छात्रसेवाकाला शिक्षण म्हणून संपूर्ण अनुभूती मिळवून देणे.

Sundaram

Teacher's Sign. :

EXPERIMENT : No. ५ Page No. Date

# * छात्रसेवाकाची/अंतरवासिता :- वैशिष्ट्ये

① छात्रसेवाकाल म्हणजे विद्यार्थी शिक्षकाला प्रत्यक्ष अनुभव देणारा कालखंड होय

② विद्यार्थी शिक्षकाला भावी व्यवसायात प्रवेश करण्यापूर्वी प्रत्यक्ष अनुभव देणारा एक नियोजकपूर्व कार्यक्रम म्हणजे छात्रसेवाकाल होय.

③ छात्रसेवाकालामध्ये विद्यार्थी शिक्षकांना अनुभवी शिक्षकाचे प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळते.

④ छात्रसेवाकालात म्हणजे शाळा व महाविद्यालयात बाहेर भरून काढणारा नियोजनपूर्वक कार्यक्रम होय

⑤ विद्यार्थी शिक्षकांमध्ये शिक्षणाविषयी व्यापक दृष्टिकोन निर्माण करणारा कार्यक्रम होय.

⑥ प्रत्यक्ष कामाचे स्वरूप, नियोजन, अंमलबजावणी व मूल्यमापन यांचे प्रशिक्षण होय

⑦ अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाच्या पद्धती व विषय आदर्शीकरण यांची जाणीव करून देणारा उपक्रम

⑧ विद्यार्थी शिक्षकांमध्ये व्यावसायिक मूल्ये रुजविण्याच्या दृष्टीने एक सक्षम नियोजनपूर्वक उपक्रम

⑨ विद्यार्थी शिक्षक व विद्यार्थी यांच्यात सुसंबंध निर्माण होवून एक उत्कृष्ट समाज निर्माण होण्याच्या दृष्टीने छात्रसेवाकाल महत्त्वाचा आहे.

Sundaram

Teacher's Sign. :

EXPERIMENT : No.

Page No. Date

# * विद्यालय अवलोकन रिपोर्ट *

## * शाळेचा परिचय :-

शाळेचे नाव :-

ज्ञानदिप माध्यमिक विद्यालय पारोळा

शाळेचा स्तर :-

प्राथमिक व माध्यमिक स्तर

शिक्षणाचा प्रकार :-

सहशिक्षण

शाळेचा पत्ता :- माध्य व उच्च माध्यमिक ~~सोमेश~~ विद्यालय योगेश्वर नगर कजगाव रोड पारोळा

शाळेचे स्थापना वर्ष :- 2003

शाळेच्या मुख्याध्यापकांचे नाव :-

श्री. के. बी. देवरे सर.

शाळेतील शिक्षकांची संख्या :-

नऊ (९)

शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या :-

तीन (३)

शाळेचे मुख्य कार्यालय

Sundaram Teacher's Sign. :

# ज्ञानदिप माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक



Scanned with CamScanner

EXPERIMENT : No.

Page No. Date

# * शिक्षकांची नावे :-

मुख्याध्यापक :-

1) श्री के. बी. देवरे सर.

उपशिक्षक / शिक्षिका :-

2) श्री भरत नवल पाटील
3) श्री अनिल प्रकाश पवार
4) हेमराज भगवान पाटील
5) श्रीमती अनिता विनायक चौधरी
6) श्रीमती उर्वशीबेन अरुणभाई सरोदे
7) श्रीमती जागृतीबेन भालचंद्र पाटील
8) योगेश भिका बोरसे (लिपीक)
9) श्री शांतनू भैय्यासाहेब पवार

# * शिपाई :-

1) श्री रविंद्र शांताराम पाटील
2) श्री किशोर अशोक खैरनार

# * शाळेतील विद्यार्थ्यांचा डाटा :-

वर्ग - विद्यार्थी संख्या

| वर्ग | मुले | मुली | | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५ वी - | 25 | 17 | = | 40 |
| ६ वी - | 32 | 28 | = | 60 |
| ७ वी - | 23 | 15 | = | 38 |
| ८ वी - | 38 | 29 | = | 67 |
| ९ वी - | 60 | 32 | = | 92 |
| १० वी - | 42 | 09 | = | 51 |

EXPERIMENT : No. Date

## * शाळेतील शैक्षणिक संसाधनांविषयी माहिती :-

① प्रत्येक वर्गात बसण्यासाठी बाकांची व्यवस्था आहे.
② तसेच फळ्याचीही व्यवस्था प्रत्येक वर्गात आहे.
③ आवश्यकतेनुसार खडू फळ्याचीही व्यवस्था आहे.
④ फळ्यावर लिहिण्यासाठी खडू तसेच डस्टरचीही व्यवस्था शाळेत आहे.
⑤ विद्यार्थ्यांना शाळेकडून विनाशुल्क पुस्तकेही दिली जातात.
⑥ शिक्षकांना आपले पुस्तक नोंदवही तसेच इतर साहित्य ठेवण्यासाठी टेबलचीही व्यवस्था आहे.
⑦ शिक्षक अध्यापनासाठी उपयोगी असणाऱ्या साहित्या-शिवाय इतर कुठलेही साहित्य स्वतः जवळ बाळगताना दिसले नाही.
⑧ प्रत्येक वर्गखोलीमध्ये पंखा तसेच CCTV कॅमेरची व्यवस्था आहे.
⑨ विद्यालयात एक सुंदर आणि भव्य संगणक कक्ष उपलब्ध आहे.
⑩ विद्यालयात एक छानसी प्रयोगशाळाही उपलब्ध आहे.
⑪ खेळासाठी लागणाऱ्या विविध साहित्य जसे फुटबॉल, क्रिकेट, शाळेत उपलब्ध आहे.

Teacher's Sign :

EXPERIMENT : No. Page No. Date

## * शाळेत शिकवले जाणारे विषय :-

शाळेची माहिती घेत असताना आम्हाला या शाळेत कोणकोणते विषय शिकवले जातात. याची माहिती मिळाली.

# * विषय *

| | | | |
|---|---|---|---|
| इयत्ता | ५वी | विषय | मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित. विज्ञान परिसर अभ्यास |
| —॥— | ६वी | —॥— | मराठी, हिंदी, इंग्रजी गणित विज्ञान भूगोल इतिहास |
| —॥— | ७वी | —॥— | मराठी, हिंदी इंग्रजी गणित विज्ञान भूगोल इतिहास ना. शास्त्र |
| —॥— | ८वी | —॥— | मराठी, हिंदी, इंग्रजी गणित विज्ञान, भूगोल, इतिहास - ना. शास्त्र |
| —॥— | ९वी | —॥— | मराठी, हिंदी, इंग्रजी गणित विज्ञान भूगोल, इतिहास ना. शास्त्र |
| —॥— | १०वी | —॥— | मराठी, हिंदी इंग्रजी, गणित विज्ञान भूगोल, इतिहास ना. शास्त्र |

Sundaram Teacher's Sign. :

EXPERIMENT : No. Page No. Date

## * विद्यालयाचे वेळापत्रक :-

परिपाठ → प्रथमसत्र → मध्यांत → द्वितीय सत्र

विद्यालयाची वेळ ही नेहमी एकच असते ती बदलत नाही केवळ शनिवारी अर्धवेळ शाळा असते.

वेळ :- सोम ते शुक्र :- १२ ते ५
शनिवार :- १२ ते ३

तासिका वेळापत्रक :- प्रत्येक तासिका हि ४० मि. असते.

| वर्ग / तासिका | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी |
|---|---|---|---|---|---|---|
| I | इंग्रजी | हिंदी | गणित | मराठी | गणित | इंग्रजी |
| II | गणित | इंग्रजी | हिंदी | इंग्रजी | विज्ञान | मराठी |
| III | हिंदी | गणित | इंग्रजी | हिंदी | इंग्रजी | गणित |
| IV | विज्ञान | मराठी | स. शास्त्र | स. शास्त्र | मराठी | विज्ञान |
| | | | Break | | | |
| V | मराठी | स. शास्त्र | विज्ञान | गणित | इतिहास | मराठी |
| VI | स. शास्त्र | विज्ञान | मराठी | विज्ञान | हिंदी | स. शा. |
| VII | गणित | शा. शि. | कला | गणित | शा. शि. | गणित |
| VIII | इंग्रजी | कला | शा. शि. | कला | इंग्रजी | कार्या. |

Sundaram

Teacher's Sign. :

EXPERIMENT : No. Date

# * मध्यान्ह भोजनाविषयी माहिती :-
(mid - day - meal)

स्वयंपाकघर :- टाकु
भांडे :- पर्याप्त

## भोजन पदार्थ

| अ. न. | वार | पाककृती |
| --- | --- | --- |
| 1) | सोमवार | मसुर डाळीचे फोडणीचे वरणभात |
| 2) | मंगळवार | वटाणा उसळ व भात |
| 3) | बुधवार | हरभरा उसळ भात |
| 4) | गुरुवार | वटाणा उसळ भात |
| 5) | शुक्रवार | हरभरा उसळ भात |
| 6) | शनिवार | मसुर डाळ व तांदुळाची खिचडी |

Teacher's Sign. :



Scanned with CamScanner

## ※ मध्यांन भोजन :-

शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना शाळेत मध्यान भोजन दिले जाते या भोजनात रोज विविध प्रकारची मेनू असतात व प्रत्येक विद्यार्थी या मध्यान भोजनाचा लाभ घेतो.

ज्ञानदीप माध्यमिक विद्यालयात देखील चांगल्या व सुंदर प्रतिचे मध्यान भोजन दिले जाते. यात दररोज वेगळा मेनू असतो. भोजन तयार झाल्यावर ते विद्यार्थ्यांना देण्या-अगोदर शाळेतील मुख्याध्यापक तसेच इतर शिक्षकवृंद त्याची चव घेतात व त्यानंतर विद्यार्थी या मध्यांन भोजनाचा आनंद घेतात.



## * शाळेतील रेकॉर्ड्स :-

विद्यालयात खालील प्रकारचे विविध रेकॉर्डची उपस्थिती आढळून येते

**शाळेतील विविध रेकॉर्ड**

- विद्यार्थी हजेरीपत्रक
- विद्यार्थी संचयी अभिलेख
- शिक्षक हजेरीपत्रक
- शिक्षकेतरकर्मचारी रेकॉर्ड
- ग्रंथालय रेकॉर्ड
- प्रयोगशाळा रेकॉर्ड
- शाळेचा आर्थिक रेकॉर्ड
- दाखलापत्र
- सुचनावही

EXPERIMENT : No. Page No. Date

# विद्यार्थी हजेरीपत्रक

## 1) विद्यार्थी हजेरीपत्रक

विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा रेकॉर्ड विद्यार्थी हजेरी पत्रकात ठेवला जातो. त्याचा नमुना पुढिलप्रमाणे

रजि.नं → विद्यार्थ्यांचे नाव → जात → जन्मतारिख → विद्यार्थ्यांची हजेरी

| Reg. No. | Sr. No. | Name of Pupil | Cast | Date of Birth | ATTENDANCE 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

Classification of Pupils on last day of the month according to caste

| | Religion | | | | | | | Sub-Caste | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Christ-ian | Moha medians | Hindu | Sikhs | Parsis | Oth-ers | Total | SC | ST | NT | SBC | O.B.C | Open | Total |
| Girls | | | | | | | | | | | | | | |
| Boys | | | | | | | | | | | | | | |
| Total- | | | | | | | | | | | | | | |

→ मुलींची संख्या

→ मुलांची संख्या

कोणकोणत्या जातिधर्माची किती मुले याची नोंद

Teacher's Sign. :

# संचयी नोंदपत्रक

## * संचयी नोंदपत्रक :-

### संचयी नोंदपत्रक (Cumulative Record)

### विद्यार्थ्याची वैयक्तिक व कौटुंबिक माहिती

विद्यार्थी आधार कार्ड संकेतांक – ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

[illegible] :– ______ माध्यम :– ______

School Udise :– ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

विद्यार्थ्याचे नाव :– ______ इयत्ता :– ______ तुकडी :– ______

(आडनाव) (नाव) (वडिलांचे नाव) लिंग :– ______

विद्यार्थी संकेतांक :– ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

जन्म दिनांक :– / / शाळा प्रवेश दिनांक :– / /

दिवस महिना वर्ष नोंदणी क्रमांक :– ______

वडिलांचे/पालकांचे नाव :– ______ मो.क्र. :– ______

कायमचा पत्ता :– ______ सध्याचा पत्ता :– ______

धर्म :– ______ जात :– ______ संवर्ग :– ______

दुर्बल घटकाचा तपशील :– ______

विद्यार्थी अपंग असल्यास प्रकार :– ______

शिक्षणात खंड पडला असल्यास कारण व कालावधी :– ______

पूर्व प्राथमिक शिक्षण झाले असल्यास केंद्राचे नाव :– ______

### कौटुंबिक माहिती

| अ.क्र. | कुटुंबातील सदस्यांची नांवे | वय | विद्यार्थ्याशी नाते | शिक्षण | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

### यापूर्वी शाळेची माहिती

| अ.क्र. | शाळेचे नाव व पत्ता | प्रवेश नोंदणी क्रमांक | वर्ष | | शाळा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |

विशेष गरज, वंचित – दुर्बल घटकासाठी शासनाने पुरविलेल्या सुविधेचा तपशील – (इयत्ता : सन : तपशील) :

______

EXPERIMENT : No. Date

# वर्णनात्मक नोंद

## वर्णनात्मक नोंदीचा तपशील

| इयत्ता | | विशेष प्रगती | सुधारणा आवश्यक |
|---|---|---|---|
| इयत्ता १ली | सत्र - १ | | |
| | सत्र - २ | | |
| इयत्ता २री | सत्र - १ | | |
| | सत्र - २ | | |
| इयत्ता ३री | सत्र - १ | | |
| | सत्र - २ | | |
| इयत्ता ४थी | सत्र - १ | | |
| | सत्र - २ | | |
| इयत्ता ५वी | सत्र - १ | | |
| | सत्र - २ | | |
| इयत्ता ६वी | सत्र - १ | | |
| | सत्र - २ | | |
| इयत्ता ७वी | सत्र - १ | | |
| | सत्र - २ | | |
| इयत्ता ८वी | सत्र - १ | | |
| | सत्र - २ | | |

# विषयात संपादित श्रेणी

## विषयात संपादित केलेली श्रेणी, उपस्थिती व आरोग्य विषयक माहिती

| शैक्षणिक वर्ष इयत्ता ↓ | विषय → | प्रथम भाषा | द्वितीय भाषा | तृतीय भाषा | गणित | परिसर-१ व विज्ञान | सामाजिक शास्त्रे/ परिसर-२ | कला | कार्यानुभव | शारीरिक शिक्षण | इतर | एकूण कार्य दिन | उपस्थिती दिन | वजन कि.ग्रॅ. | उंची सें.मी. | वैद्यकीय अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष : ......... | सत्र १ | | | | | | | | | | | | | | | |
| इयत्ता : १ली | सत्र २ | | | | | | | | | | | | | | | |
| वर्ष : ......... | सत्र १ | | | | | | | | | | | | | | | |
| इयत्ता : २री | सत्र २ | | | | | | | | | | | | | | | |
| वर्ष : ......... | सत्र १ | | | | | | | | | | | | | | | |
| इयत्ता : ३री | सत्र २ | | | | | | | | | | | | | | | |
| वर्ष : ......... | सत्र १ | | | | | | | | | | | | | | | |
| इयत्ता : ४थी | सत्र २ | | | | | | | | | | | | | | | |
| वर्ष : ......... | सत्र १ | | | | | | | | | | | | | | | |
| इयत्ता : ५वी | सत्र २ | | | | | | | | | | | | | | | |
| वर्ष : ......... | सत्र १ | | | | | | | | | | | | | | | |
| इयत्ता : ६वी | सत्र २ | | | | | | | | | | | | | | | |
| वर्ष : ......... | सत्र १ | | | | | | | | | | | | | | | |
| इयत्ता : ७वी | सत्र २ | | | | | | | | | | | | | | | |
| वर्ष : ......... | सत्र १ | | | | | | | | | | | | | | | |
| इयत्ता : ८वी | सत्र २ | | | | | | | | | | | | | | | |

## प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र

(महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११)

परिशिष्ट – दोन नमुना – ३

प्रमाणित करण्यात येते की कुमार/कुमारी ______________________

______________________ याने / हिने बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम २९ मध्ये विहित केलेल्या निकषानुसार आपले इ. ८वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. त्याने / तिने इ. आठवी पर्यंतची अर्हता व विद्याविषयक कौशल्ये प्राप्त केले आहेत.

शाळेचा शिक्का दिनांक :–   /   /      मुख्याध्यापक

# शिक्षक हजेरी

## * शिक्षक हजेरी :-

शाळेमध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या उपस्थिती दर्शविण्यासाठी या रजिस्टरचा वापर केला जातो.

अ.नं → शिक्षकांचे नाव → हुद्दा → रजा → मागील रजा → इतर रजा

| Sr. No | Name of the Employee | Designation | Muster Roll for Month of July 2019 | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | Days of CL | D.O. CL up to last Month | Total Days of CL | Any other Leave | Remark. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | |

→ शिक्षकांच्या सह्या तसेच सुट्ट्या

एकूण रजा शेरा

# * विद्यालयासंबंधीचा रेकॉर्ड :-

**विविध रेकॉर्ड्स**

- परिसराचा दस्तावेज
- नोंदणीचे कागदपत्र
- विद्यालयातील उपकरणांच्या रेकॉर्ड
- विद्यालयाच्या विविध खोल्यांचा रेकॉर्ड
- कार्यउपयोगी साहित्याचा रेकॉर्ड
  - बेंचेस संख्या
  - डेस्क संख्या
  - टेबल व खुर्च्या
- स्वयंपाकघरातील वस्तुंचा रेकॉर्ड
- खेळासाठी उपयोगी साहित्याचा रेकॉर्ड
- इतर

EXPERIMENT : No.

Page No. Date

# *प्रयोगशाळा :-

प्रयोगशाळा हि शाळेचा एक अविभाज्य भाग आहे. विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयाची आवड निर्माण करण्यासाठी तसेच विज्ञानातील प्रत्येक प्रयोग विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समजावून सांगण्यासाठी प्रयोगशाळेची आवश्यकता असते.

प्रयोगशाळेत एक रजिस्टर असते व ज्यामध्ये प्रयोगशाळेतील प्रत्येक हालचालीचे रेकॉर्ड ठेवले जातात. कोणकोणते उपकरणे व साहित्य प्रयोगशाळेत उपस्थित आहे. या सर्वांची माहिती प्रयोगशाळेत असते. त्यात मुख्यत: खालील बाबींचा समावेश असतो

- प्रयोगशाळेतील संबंधित साहित्य :-
- प्रयोगशाळेत असणाऱ्या खोलीची संख्या :-
- प्रयोगशाळेतील उपकरणांचा रेकॉर्ड
  - रसायन विज्ञान हेतू उपकरणे विवरण
  - भौतिक — " —
  - जिवविज्ञान — " —
- प्रयोगशाळेत कपाटाची संख्या व नावे :-

Teacher's Sign. :

संगणक कक्ष



EXPERIMENT : No.

Page No.
Date

## संगणक कक्ष :-

आंतरवासिता दरम्यान मिळालेल्या शाळेची पाहणी करत असताना खुप गोष्टी शिकावयास मिळतात. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासोबतच संगणकाचे ज्ञान देणे हेसुद्धा तितकेच महत्वाचे आहे.

अंतरवासिता विद्यार्थ्यांना या गोष्टीची दखल घेतली जाते. व त्यासाठी एक प्रशस्त व सुंदर संगणक कक्ष बनवण्यात आला आहे. त्यात १५-२० संगणक तसेच टेबल व खुर्च्या यांची व्यवस्था करण्यात आली आहे.



Teacher's Sign. :


# खेळ



# गणित दिवस



# शिक्षण - व्यतिरिक्त कार्यक्रम :-




विद्यालयात अध्ययन - अध्यापनाव्यतिरिक्त खुप सारे कार्यक्रम घेतले जातात.
उदा :- परिपाठ, विविध सामाजिक जागरुकता कार्यक्रम तसेच मैदानी व बंदिस्त खेळ, विविध सांस्कृतिक कार्यक्रम इ. कार्यक्रम शाळेत घेतले जातात.

EXPERIMENT : No. Date

# * परिपाठ :-

समाज विकासाचे प्रभावी साधन म्हणजे शिक्षण होय. परंतु शिक्षण म्हणजे केवळ अध्ययन व अध्यापन नव्हे. तर शिक्षणाबरोबर शालाबाह्य व इतर कार्यक्रम देखिल महत्वाचे आहे.

परिपाठ हा प्रत्येक शाळेचा व शाळेच्या सुरुवातीचा अविभाज्य घटक आहे. ज्ञानदिप माध्यमिक विद्यालयात परिपाठ ठिक 12 वाजता सुरु होतो. परिपाठात प्रार्थना, प्रतिज्ञा राष्ट्रगीत, पसायदान व पंचांग दिनविशेष तसेच इतर महत्वाच्या गोष्टीचा समावेश असतो. परिपाठाने प्रत्येक शाळेची सुरुवात होत असते. मुलांना शाळेत शिकवण्यास सुरुवात करण्याअगोदर परिपाठ होणे गरजेचे असते. प्रत्येक विद्यार्थी प्रार्थना म्हणतो. प्रार्थनेतून देवाचे नामस्मरण होते व देवाला सांगितले जाते कि भगवंता आजचा दिवस आनंदात व प्रसन्न जाओ.

परिपाठातील महत्वाचा घटक म्हणजे प्रार्थना व शाळेची प्रार्थना अगदी सुंदर व मनाला प्रसन्न करणारी आहे.

Teacher's Sign. :

EXPERIMENT :

# * विद्यालयाची प्रार्थना :-

असो तुला देवा ! माझा सदा नमस्कार
असो तुला देवा ! माझा सदा नमस्कार
तुझ्या दयादातृत्वाला अंत नाहि पार ॥धृ॥

तुझ्या कृपेने रे होतिल फुले फत्तराची
तुझ्या कृपेने रे होतिल मोती मृत्तिकेची
तुझ्या कृपेने रे होतिल सर्प रम्य हार
असो तुला देवा ! माझा सदा नमस्कार ॥१॥

तुझ्या कृपेने होईल उषा त्या निशेची
तुझ्या कृपेने होईल सुधा त्या विषाची
तुझ्या कृपेने होईल पंगु सिंधु पार
असो तुला देवा ! माझा सदा नमस्कार ॥२॥

तुझ्या कृपासिंधूमधला बिंदु जरि मिळेल
तरि प्रभो शतजन्मांची मत्तृषा शमेल
तुझे म्हणुनि आलो राया बघत बघत दार
असो तुला देवा ! माझा सदा नमस्कार ॥३॥

Teacher's Sign. :

# संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान



Date

# शालेय उपक्रम :-

## 1] संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान :-

दिनांक 20 डिसेंबर 2023 रोजी ज्ञानदिप माध्यमिक विद्यालयात संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबविण्यात आले शाळा तसेच शाळेचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

तसेच विद्यालयाचे प्राचार्य येथील के. बी. देवरे सरांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन केले व वक्तृत्व स्पर्धेला सुरुवात झाली. बरेच विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबांच्या कारागिरीबद्दल अतिशय छान प्रकारे छान छान गीते द्वारे सादर केली. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले तसेच चौधरी मॅडमांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# सावित्रीबाई फुले जयंती



# 2> सावित्रीबाई फुले जयंती :-

दिनांक 3 जानेवारी 2024 रोजी ज्ञानदीप माध्यमिक विद्यालय पारोळा येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. के बी देवरे. सरांनी प्रतिमापुजन करुन कार्यक्रमाला सुरुवात केली नंतर वक्तृत्व स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. काही विद्यार्थिनींनी स्वत: सावित्रीबाईंची वेशभूषा परिधान करुन भाषण दिले या स्पर्धेत 28 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्टप्रकारे भाषण सादर केले. विद्यार्थ्यांची विविध प्रकारची मते त्यांच्या वक्तृत्वास्पर्धेतून मांडली या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक व शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, आन्तरवासिता शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जागृती पाटील मॅडमांनी केले व या शाळेचे शिक्षक हेमराज पाटील सरांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमांची सांगता केली

स्वामी विवेकानंद
आणि
राजमाता जिजाऊसाहेब जयंती



Date

# ३] स्वामी विवेकानंद जयंती राजमाता जिजाऊसाहेब जयंती

ज्ञानदिप बहुददेशीय विद्याप्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज १२ जानेवारी 2024 रोजी स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊसाहेब भोसले यांची जयंती साजरी करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक श्री के. बी. ढवरे सरांनी प्रतिमापुजन करुन कार्यक्रमाला सुरुवात केली. या स्पर्धेत 32 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट प्रकारे भाषण सादर केले. विद्यार्थ्यांची विविध प्रकारची मते, त्यांच्या वक्तृत्वातून मांडली. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक व शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता ८ वी च्या विद्यार्थिनींनी सुत्रसंचालन केले. त्यानंतर मुख्याध्यापकांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

Teacher's Sign. :

# हळदी कुंकू



EXPERIMENT : No. Date

# 4. हळदी कुंकू

"यत्र नार्यस्तु पुज्यन्ते
रमन्ते तत्र देवता:"

हि ~~म्हन~~ म्हण अनादिकालापासून आपण ऐकत आहोत पण मला सांगा या म्हणीनुसार आपण जुन्या रुढी परपरा विसरत चालली आहोत यासाठी आम्ही सहजिवन शिक्षण प्रसारक मंडळ टेहू शिक्षक विद्यार्थीनींनी 28 जानेवारी 2024 रोजी ज्ञानदिप माध्यमिक विद्यालय पारोळा येथे हळदी कुंकू चा कार्यक्रम आयोजित केला या कार्यक्रमासाठी प्राध्यापिका माननीय सौ पुनम बोरसे मॅडम या उपस्थित होत्या तसेच ज्ञानदीप उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षिकाही या कार्यक्रमात उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सांगता ही नाव घेऊन कार्यक्रम पार पाडण्यात आल झाला.

तसेच सहजिवन प्रसारक मंडळच्या सर्व शिक्षक विद्यार्थी महिला यांनी सर्व शिक्षीकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली

# सांस्कृतिक कार्यक्रम



EXPERIMENT : No. Page No. Date

# 5 सांस्कृतिक कार्यक्रम

आज दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी ज्ञानदिप माध्यमिक विद्यालय परोळा येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुप्त कलागुणांना वाव देण्याचा... अशा या वार्षिक स्नेहसंमेलनाचे "नवतरंग" 2024 असे म्हणतात.

या कार्यक्रमास आम्ही 4 वाजता उपस्थित झालो. या कार्यक्रमासाठी आम्ही इयत्ता आठवी व दहावी वर्गाच्या मुलींच्या नृत्यांची जबाबदारी आम्ही घेतली होती प्रमुख पाहुण्यांचे स्वागत लेझीमद्वारे करून कार्यक्रम हा चार वाजून ४ चाळीस मिनीटांनी सुरु झाला सुरुवातीला गणेशवंदना व गाण्यावरुन सुरुवात करण्यात आली या कार्यक्रमात गाण्यासोबतच नाटकही सादर करण्यात आले होते. या कार्यक्रमात भरपूर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच विद्यार्थ्यांचा आवडता कार्यक्रम बघून त्यांच्यातली उत्सुकता बघून खूपच आनंद आम्हालाही झाला होता

विद्यार्थ्यांचा त्या मेहनतील सर्व खूप कष्ट, सराव, याप्रकार काही कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये या कार्यक्रमातून दिसून आले.

# आंनद मेळावा



# ६> आनंद मेळावा :-

आज १४ फेब्रुवारी आज ज्ञानदिप माध्यमिक विद्यालय येथे आनंदमेळावा साजरा करण्यात आला
आनंद मेळाव्यात विद्यार्थी - विद्यार्थीनी अतिशय उत्साहाने खूप छान छान व चविष्ट व चटकदार खाद्यपदार्थ बनवुन आणले होते स्टॉलची मांडणी, विविध पदार्थांची विक्री, खरेदी व विविध पदार्थांचा आस्वाद घेण्याचा आनंद मुलांनी लुटला.
सकाळी मान्यवरांच्या हस्ते बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.
विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताण तणाव दूर करुन विरंगुळा मिळावा व त्यांच्यातील अंगिकृत सुप्त कलागुणांना वाव देता यावा या उद्देशाने दरवर्षी आनंद मेळाव्याचे आयोजन केले जाते
कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्ञानदीपचे मुख्याध्यापक देवरे सर, तसेच तेथील शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

Sundaram

Teacher's Sign. :

EXPERIMENT : No. Date

# कृतीसंशोधनाविषयी माहिती

सन 2023-24 च्या बी.एड अभ्यासक्रमानुसार उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाअंतर्गत अंतरवासिताच्या कार्यकालात छात्राध्यापकास आपल्याला मिळालेल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांची समस्या घेवून त्यावर एक अहवाल सादर करावा लागतो यालाच कृतिसंशोधन असे म्हणतात.

मी "ज्ञानदिप माध्यमिक विद्यालय येथील इयत्ता ९ वी च्या वर्गातील नकाशा अडखळत वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तक साहित्य, व उपक्रम देवून वाचनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे व उपाय शोधणे" हा विषय कृतीसंशोधनासाठी निवडला.

या कार्यासाठी मला खालील मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले

मार्गदर्शक :-

प्राध्यापक डॉ संजय मोरे सर
मुख्याध्यापक :- श्री के.बी देवरे सर
विषय शिक्षक :- श्रीमती आनंता चौधरी मॅडम

तसेच इतर शिक्षक व माझे सहध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले.

Sundaram Teacher's Sign. :

EXPERIMENT : No. Date

# निरोप समारंभ

बी. एड द्वितीय वर्ष अभ्यासक्रमांतर्गत अंतरवासिकसाठी ज्ञानदिप माध्यमिक विद्यालय पारोळा येथे आमच्या गटाची नियुक्ती करण्यात आली. त्यादरम्यान आम्ही या शाळेवर दररोज तासिका घेतल्या येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी आम्हाला वेळो-वेळी सहकार्य केले व आम्हास प्रत्येक गोष्टीसाठी मोलाचे योगदान लाभले.

माननीय प्रिन्सिपल डॉ संजय मोरे यांनी आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन केले या अंतरवासिकाकालावधीत आम्ही अनेक उपक्रम राबवले तसेच विद्यालयाचे मूल्यमापन करण्यासाठी चाचणी घेतली.

या कालावधीत आम्ही शाळेत असे रमलो की आम्हाला विसरच पडला की आम्ही काही काळासाठीच आलो आहोत. तेथले शिक्षक शिक्षिका जणु काही आमचे कौटुंबिक नातेच जमले होते.

आम्ही सर्व छात्राध्यापकांनी मिळून शाळेला भेटवस्तु दिली. व आम्ही हायस्कुलचा निरोप घेतला

" निरोप देताना आपुले, मन होई हे जड!
गुरु-शिष्याचे हे नाते, नेहमी राहो गोड!

Teacher's Sign. :

EXPERIMENT : Date

# समारोप

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बी.एड. अभ्यासक्रमानुसार द्वितीय वर्ष सन 2023-2024 च्या अंतरवासिता हा उपक्रम अतिशय महत्वाचा आहे. मला शिक्षणशास्त्र महाविद्यालय एरंडोल पारोळा अंतर्गत ज्ञानदिप माध्यमिक विद्यालय पारोळा येथे अंतवासितेचे काम मिळाले.

या विद्यालयात अंतरवासितेसाठी नियुक्ती झाल्यानंतर काही दिवसातच तेथील शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी छान ओळख झाली. व तेथील शिक्षकांनी आम्हाला त्याच्यात पुर्णपणे सहभागी करुन घेतले जणू. आम्ही त्यांच्यात सहभागी करुन घेतले व त्याच्या शाळेच शिक्षक आहोत अशी वागणूक दिली.

आम्हाला अध्यापनासाठी जे वर्ग मिळाले त्यांना आम्ही व्यवस्थित शिकवण्याचा प्रयत्न करुन शालाबाह्य स्पर्धांमध्ये भाग घेऊन विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन या उपक्रमाचे व्यवस्थित निरिक्षण केले.

अशा पद्धतीने अंतरवासितेच्या माध्यमातून आम्हाला एक शिक्षक कसा असावा व त्याच्या जबाबदाऱ्या काय असतात याची कल्पना झाली. व सदैव मी एक चांगली व आदर्श (कलाकारवृत्ती) शिक्षिका बनण्याचा प्रयत्न करेन।